# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०२/०९/२०१६

**१) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी ११.४० वा. दर. यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन यातील जखमी सुक्तातील शालीकराम शामकुवर वय २७ वर्ष, रा. टेकेपार डोडमाझरी हा सर्विस रोडने आपल्यां मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ११८९ ने शहापुर कडे जात असतांनी त्यास फुलमोगरा येथे धडक मारुन जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने जखमीचे बयान, डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १३४/१८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन काठीने मारुन जखमी केले . :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील फिर्यादी प्रशांत परमानंद गजभिये वय २० वर्ष, रा. पाचगाव हा व आरोपी हे पाचगाव येथील राहणारे असुन फिर्यादी हा गावातील पोळया मध्ये आपल्या मित्राच्या गो—या सोबत असतांना त्याने मित्राशी मजाक केली व मित्रावर चिखल उडविला या कारणा वरुन आरोपी याने भांडण करुन फिर्यादीच्या डोक्यावर व डावे मानेवर काठीने मारुन जखमी केले. असे फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो. स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन काठीने मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील आरोपी क्र. १ व २ यांचे फिर्यादी सोबत पटत नसल्यामुळे कोणतेतरी कारण नसतांना फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करुन संगनमत करुन आरोपी क्र. १ ने त्याचे हातातील काठीने फिर्यादीचे डोक्यावर व पाठीवर मारुन जखमी केले व नंतर फिर्यादीचे वडील भांडण सोडविण्यास आले असता आरोपी क्र. १ ने त्याचे हातातील काठीने फिर्यादीच्या वडीलाच्या उजव्या हातावर मारहान केली व पुन्हा शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी निखील विलास मेश्राम वय २५ वर्ष, रा. शिवनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. राऊत पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी ०६.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये १० काळया रंगाचे हेले व ०६ म्हशी एकुण १६ जनावरे कि. ६०,०००/—रु. चे डांबुन, कोंबुन निदर्यतेची वागणुक देवुन अवैद्यरित्या वाहतुक करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(ड)(ई) प्रा.नी वा.कायदा. सहकलम ६६/१९२,८३ एमएमव्हीआर/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो. स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून बिना पास परवाना वाहतुक करत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ३१/०८/२०१६ रोजी २३.१५ वा. दर. यातील आरोपी क्र. १ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १०४ बकरे, बक—या व आरोपी क्र. २ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ७३ बक—या कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने यातील आरोपीतांनी जवळ बक—या वाहुण नेण्यासंबधात कोणत्याच प्रकारचे कागदपत्र न मिळुन आल्याने दोन्ही आरोपीतांच्या ताब्यातील वाहनामध्ये एकुण १७७ बकरे, बक—या कि. ३,५४,०००/—रु. चा माल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ११(१)(५) प्रा.नि.वा.का. सहकलम २३/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई.:—

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०१ केसेस, अवैध प्रवासी ०१ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ६८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.